SAMPLE CONTENT

PRO LinGo

# मराठी (HL)

# व्याकरण व लेखन




## इयत्ता सातवी

(मराठी माध्यम)


सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.



Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित पाठ्यपुस्तकावर आधारित.

# मराठी (HL)
# व्याकरण व लेखन
## इयत्ता सातवी (मराठी माध्यम)

### ठळक वैशिष्ट्ये

- पाठ्यपुस्तकातील व्याकरण व लेखनावर आधारित कृती समाविष्ट
- व्याकरण विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण
- व्याकरण विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव
- उत्तरे लिहिण्याकरिता पर्याप्त जागा उपलब्ध
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरिता उत्तरसूची समाविष्ट
- लेखन विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत
- लेखन विभागातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेल्या भरपूर कृती
- लेखन विभागातील घटकांमध्ये आवश्यक तेथे सरावासाठी मुबलक कृती समाविष्ट

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2022MH0007
TEID: 3429
P.O. No. 11123

# प्रस्तावना

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील प्रत्येक टप्पा महत्त्वाचा असतो. इयत्ता सातवीचे वर्षही विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत भाषा महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे, मराठी विषयात उत्तम गुण मिळवण्यासाठी, व्याकरण घटकांचा सखोल अभ्यास करण्याची सवय लागावी यासाठी, तसेच भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी **लेझी बोन एज्युकेशनचे मराठी (HL) व्याकरण व लेखन इयत्ता सातवी** हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती सोपवताना आम्हांला आनंद होत आहे.

व्याकरणाच्या पायावर भाषेची इमारत उभी राहते. हा पाया मजबूत असेल, तर भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे जाते, तसेच व्याकरणात अधिकाधिक गुण मिळवणे सहज शक्य होते. यासाठी व्याकरण घटकांच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांची ही गरज ओळखून आम्ही या संकल्पनांचे सहज सोप्या भाषेत स्पष्टीकरण देण्याबरोबरच भरपूर सरावकृती समाविष्ट केल्या आहेत. शब्दसंपत्ती व व्याकरणावरील विद्यार्थ्यांची पकड मजबूत होईल याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

लेखन विभागात नवनिर्मितीचा आनंद दडलेला असतो. विद्यार्थ्यांना स्वभाषेत लिखाणास प्रवृत्त करणे हा या अभ्यासामागील मूळ उद्देश आहे. लेखन विभागामध्ये समाविष्ट घटकांचे लेखन कसे करावे? कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात? यासंदर्भातील सविस्तर विवेचन प्रत्येक घटकाच्या प्रारंभी देण्यात आले आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी अनेक नमुना कृतींनी यातील सारे घटक समृद्ध करण्यात आले आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला वाव मिळेल याची आम्हांला खात्री आहे.

व्याकरणावर आधारित भरपूर कृती, लेखन विभागातील ३० निबंध, १२ पत्र, ८ संवाद, ६ मुलाखतीकरिता प्रश्नावली, ७ जाहिराती, ६ बातमी लेखन व आकलन, ४ सूचनाफलक, ६ शीर्षकलेखन, १० कथा, घोषवाक्ये, शुभेच्छा संदेश एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरिता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती :** प्रथम

हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय support@lazybone.in या इ-मेल पत्त्यावर पाठवावा, ही नम्र विनंती.

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी बालभारती, पाचवी पुनर्मुद्रण : २०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **व्याकरण विभाग** | |
| १. | शब्दांच्या जाती | |
| • | नाम | १ |
| • | सर्वनाम | ३ |
| • | विशेषण | ६ |
| • | क्रियापद | ९ |
| • | क्रियाविशेषण अव्यय | १२ |
| • | शब्दयोगी अव्यय | १४ |
| • | उभयान्वयी अव्यय | १६ |
| • | केवलप्रयोगी अव्यय | १७ |
| २. | विभक्ती प्रत्यय | २० |
| ३. | उपसर्ग आणि प्रत्यय | २३ |
| ४. | शब्दसिद्धी | २७ |
| ५. | वाक्याचे प्रकार | २९ |
| ६. | काळ | ३२ |
| ७. | समानार्थी शब्द | ३५ |
| ८. | विरुद्धार्थी शब्द | ३९ |
| ९. | लिंग | ४२ |
| १०. | वचन | ४५ |
| ११. | वाक्प्रचार | ४९ |
| १२. | म्हणी | ६३ |
| १३. | लेखननियम | ६८ |
| १४. | विरामचिन्हे | ७३ |
| १५. | शब्दसंपत्ती | ७७ |
| १६. | भाषिक खेळ | ९० |
| • | सराव कृतिपत्रिका - १ | ९५ |
| • | सराव कृतिपत्रिका - २ | ९७ |
| • | उत्तरे | ९९ |
| | **लेखन विभाग** | |
| १. | निबंधलेखन | ११८ |
| २. | पत्रलेखन | १३३ |
| ३. | संवादलेखन | १४२ |
| ४. | मुलाखत | १४६ |
| ५. | जाहिरात | १४८ |
| ६. | बातमीलेखन | १५४ |
| ७. | सूचनाफलक | १५८ |
| ८. | शीर्षकलेखन | १६० |
| ९. | कथालेखन | १६३ |
| १०. | घोषवाक्ये | १६८ |
| ११. | शुभेच्छा संदेश | १७० |


**[टीप : पाठ्यपुस्तकातील व्याकरण व लेखनावर आधारित प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

Sample Content

# व्याकरण विभाग

## १ शब्दांच्या जाती

आपण आपल्या मनातील भावना वाक्यरूपाने प्रकट करतो. वाक्य हे शब्दांचे बनलेले असते. आपण बोलताना अथवा लिहिताना वेगवेगळ्या शब्दांचा उपयोग करतो. या शब्दांच्या कार्यानुसार त्यांना वेगवेगळी नावे देण्यात आली आहेत. त्यांना शब्दांच्या जाती म्हणतात. एकूण शब्दांच्या आठ जाती आहेत. त्यांचे दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते. त्यांचे वाक्यात उपयोग करताना ज्या शब्दांच्या रूपात बदल होतो त्यांना 'विकारी किंवा सव्यय शब्द' म्हणतात. ज्या शब्दांमध्ये मुळीच बदल होत नाही त्यांना 'अविकारी किंवा अव्यय शब्द' म्हणतात.

**शब्दांच्या जाती**

**विकारी शब्द (सव्यय)**
- नाम
- सर्वनाम
- विशेषण
- क्रियापद

**अविकारी शब्द (अव्यय)**
- क्रियाविशेषण अव्यय
- शब्दयोगी अव्यय
- उभयान्वयी अव्यय
- केवलप्रयोगी अव्यय

### नाम

**कोणतीही व्यक्ती, वस्तू, जागा, प्राणी, पक्षी अथवा मनातील भावना यांना दिलेले नाव म्हणजे 'नाम' होय.**

**नामांचे प्रकार**

- सामान्यनाम
- विशेषनाम
- भाववाचकनाम

**सामान्यनाम :** एकाच प्रकारातील किंवा जातीतील वस्तूंचा, व्यक्तींचा बोध ज्या नामाद्वारे होतो त्याना 'सामान्यनाम' असे म्हणतात.

**उदा.** व्यक्ती, गाव, नदी, पर्वत, देश, प्राणी इत्यादी.

**विशेषनाम :** विशिष्ट वस्तू किंवा व्यक्तीचा बोध ज्या नामाद्वारे होतो त्यांना 'विशेषनाम' असे म्हणतात.

**उदा.** समीर, अजय, हिमालय, गंगा, महाराष्ट्र, सह्याद्री इत्यादी.

**भाववाचकनाम :** मनातील भाव-भावना, गुणधर्म व स्वभाववैशिष्ट्ये यांना दिलेल्या नावांना 'भाववाचकनाम' असे म्हणतात.

**उदा.** चपळाई, आनंद, आपुलकी, गोडवा, शौर्य, गुलामगिरी इत्यादी.

Sample Content

## सराव कृती

**१. खालील वाक्यांतील नामे ओळखा.**

i. माणसाला स्वप्नं बघता आली पाहिजेत. – ____________

ii. त्यातून त्यांना खूप आनंद मिळत असे. – ____________

iii. बायकांनी गाडीजवळच चुली पेटवल्या. – ____________

iv. मीरानं मोळ्या बांधल्या. – ------------------------------------------------

v. आम्ही आजही माठातलं थंडगार पाणी पितो. – ------------------------------------------------

vi. भाऊ स्वदेशी चळवळ, भारतीय इतिहास, भारतीय स्वातंत्र्य या विषयांवर भाषणं देत असत. – ------------------------------------------------

vii. एका गावात सदा व सखू नावाचे जोडपे राहत होते. – ------------------------------------------------

viii. त्याची हुशारी, चपळता अगदी वाखाणण्याजोगी होती. – ------------------------------------------------

ix. शेख महंमदचं एक छोटंसं दुकान होतं. – ------------------------------------------------

x. मी शेखच्या हातावर मिठाई ठेवली. – ------------------------------------------------

## २. खालील वाक्यांतील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा.

i. त्याचा हा नेहमीचाच विचित्रपणा असेल म्हणून त्यांनी टाळलं.

**उत्तर :** ------------------------------------------------

ii. धोंडा पाहून तो शहारला.

**उत्तर :** ------------------------------------------------

iii. श्रुतीनं सहज वर बघितलं.

**उत्तर :** ------------------------------------------------

iv. असं करत लोभ आणि अधीरतेनं तिन भल्यामोठ्या शतपादावर झडप मारली.

**उत्तर :** ------------------------------------------------

v. कसलंही चैतन्य नव्हतं.

**उत्तर :** ------------------------------------------------

vi. मी तो लिफाफा उघडला.

**उत्तर :** ------------------------------------------------

vii. त्याच्या नावाची कीर्ती सर्वदूर पसरली.

**उत्तर :** ------------------------------------------------

## ३. पुढील नामांचा वाक्यात उपयोग करा.

i. ग्रह – ------------------------------------------------

ii. गंगा – ------------------------------------------------

Sample Content

iii. केशव – ----------

iv. रस्ता – ----------

v. सौंदर्य – ----------

vi. गोडवा – ----------

vii. देश – ----------

viii. राजा – ----------

ix. मित्र – ----------

x. प्रेमळपणा – ----------

## ४. पुढील शब्दांपासून भाववाचकनामे तयार करा.

| | | | |
|---|---|---|---|
| i. माणूस – | ---------- | ii. शूर – | ---------- |
| iii. नम्र – | ---------- | iv. सुंदर – | ---------- |
| v. श्रीमंत – | ---------- | vi. गार – | ---------- |
| vii. देव – | ---------- | viii. मधुर – | ---------- |
| ix. मोठा – | ---------- | x. शांत – | ---------- |

Sample Content

### सर्वनाम

**नामाऐवजी वाक्यात वापरल्या जाणाऱ्या शब्दाला 'सर्वनाम' असे म्हणतात.**

मी, तू, तो (ती, ते, त्या), हा (ही, हे, ह्या), जो (जी, जे, ज्या), कोण, आपण, काय, स्वत: अशी सर्वनामे वाक्यात नामाऐवजी वापरली जातात.

**सर्वनामांचे प्रकार**

पुरुषवाचक | दर्शक | संबंधी | प्रश्नार्थक | सामान्य/अनिश्चित | आत्मवाचक

१. **पुरुषवाचक सर्वनाम :** बोलणारी किंवा लिहिणारी व्यक्ती स्वत:बद्दल अथवा ज्याच्याशी बोलते त्याच्याबद्दल अथवा त्रयस्थ व्यक्तीसाठी जे सर्वनाम वापरते त्याला 'पुरुषवाचक सर्वनाम' म्हणतात.

**उदा.** मी, आम्ही, तू, तुम्ही, तो, ती, ते, त्या.

२. **दर्शक सर्वनाम :** जवळची अथवा दूरची वस्तू किंवा व्यक्ती दाखविण्यासाठी ज्या सर्वनामांचा उपयोग केला जातो त्यांना दर्शक सर्वनामे म्हणतात.

**उदा.** तो, ती, ते, त्या, हा, ही, हे, ह्या.

**लक्षात ठेवा**

**दर्शक सर्वनाम आणि सार्वनामिक विशेषण यांतील फरक :**
साधारणपणे नामापूर्वी येणारे सर्वनाम त्या नामाबद्दल अधिक माहिती देत असेल, तर ते सर्वनाम न राहता सार्वनामिक विशेषण होते; मात्र जर तो, ती, ते, त्या, हा, ही, हे, ह्या यांचा वापर वाक्यातील कर्ता म्हणून होत असेल, तर ती दर्शक सर्वनामे असतात.

**उदा.** **तो** मुलगा आहे.
**ते** झाड आहे.

जर तो, ती, ते, त्या, हा, ही, हे, ह्या यानंतर सर्वनामाचे षष्ठीचे रूप असेल, तर ती दर्शक सर्वनामे असतात आणि सर्वनामाचे षष्ठीचे रूप हे सार्वनामिक विशेषण असते.

**उदा.** **ते** माझे घर आहे.
**हा** आमचा कुत्रा आहे.

जर तो, ती, ते, त्या, हा, ही, हे, ह्या नंतर विशेषण व त्यानंतर नाम असेल, तर ती दर्शक सर्वनामे असतात.

**उदा.** **तो** हुशार मुलगा आहे.
**ते** जंगली फळ आहे.
**ती** सुंदर मुलगी आहे.

३. **संबंधी सर्वनाम :** वाक्यात पुढे येणाऱ्या दर्शक सर्वनामाशी संबंध दाखवणाऱ्या सर्वनामांना संबंधी सर्वनाम असे म्हणतात.
**उदा.** **जे** पेरावे, ते उगवते.
**जो** गर्जेल, तो पडेल काय ?
**जो** करेल, तो भरेल.

४. **प्रश्नार्थक सर्वनाम :** एखाद्या नामाला प्रश्न विचारण्यासाठी वापरलेल्या प्रश्नसूचक शब्दाला प्रश्नार्थक सर्वनाम असे म्हणतात.
**उदा.** कोण, काय, कोणी, कोणाला.
महाभारत **कोणी** लिहिले ?
भरताने रामाकडून **काय** घेतले ?

५. **सामान्य किंवा अनिश्चित सर्वनाम :** कोण/काय या शब्दांचा उपयोग प्रश्न विचारण्यासाठी न करता ते कोणत्या नामासाठी वापरले आहेत हे निश्चितपणे सांगता येत नसेल, तर त्यांना सामान्य/अनिश्चित सर्वनाम असे म्हणतात.
**उदा.** **कोणी**, **कोणाला** हसू नये.
**कोणी** निंदा, **कोणी** वंदा, हसवणे हा आमचा धंदा.

६. **आत्मवाचक सर्वनाम :** कर्त्यानंतर आपण, स्वत: या सर्वनामांचा वापर केल्यास त्यांना आत्मवाचक सर्वनामे म्हणतात.
**उदा.** तू **स्वत:** जाऊन बघ.
तो **आपण**हून निघून गेला.
मी **स्वत:** अनुभव घेतला आहे.

Sample Content

## सराव कृती

**१. खालील वाक्यांतील सर्वनामे ओळखा.**

i. आम्ही आवाजाच्या दिशेनं धावत जायचो. – ----------------

ii. त्यानं आजवर घोड्यावरून खूप प्रवास केला होता. – ----------------

iii. थांब, मी सांगतो त्यांना आपला इतिहास. – ----------------------------------------

iv. त्यांना गजानन नावाचा मुलगा होता. – ----------------------------------------

v. त्याने ती ओळखीच्या घरी ठेवली होती. – ----------------------------------------

vi. मला येताना पाहून त्याला एकदम हायसं वाटलं. – ----------------------------------------

vii. त्याची दुडदुड चाल भावणारीच. – ----------------------------------------

## २. खालील वाक्यांतील सर्वनामे ओळखून प्रकार लिहा.

i. तो वह्यांची किरकोळ विक्री करायचा.

**उत्तर :** ----------------------------------------

ii. ती आमच्याकडेच राहते.

**उत्तर :** ----------------------------------------

iii. मी झुबेदाला कधीच भेटले नव्हते.

**उत्तर :** ----------------------------------------

iv. कोणी मला अशा अवस्थेत पाहिलं, तर त्याला वाटेल, की माझं काहीतरी हरवलंय.

**उत्तर :** ----------------------------------------

v. काय करावं त्याला सुचत नव्हतं.

**उत्तर :** ----------------------------------------

vi. कुणी कुणी तर स्वप्नांना भलतंच तुच्छ लेखतात.

**उत्तर :** ----------------------------------------

vii. जे स्वप्न माणसाला समृद्ध करतं, ते बघण्यासाठी संवेदनशील मन असावं लागतं.

**उत्तर :** ----------------------------------------

viii. कोण रे बाबा तू ?

**उत्तर :** ----------------------------------------

ix. काय बोलावं कोणालाच समजेना.

**उत्तर :** ----------------------------------------

x. मी स्वत : लिफाफा उघडला.

**उत्तर :** ----------------------------------------

Sample Content

## ३. पुढील सर्वनामांचा वाक्यात उपयोग करा.

i. तू – ____________________

ii. कोण – ____________________

iii. आपण – ____________________

iv. हे – ____________________

v. ती – ____________________

vi. मला – ____________________

vii. स्वत: – ____________________

viii. तुम्ही – ____________________

ix. जे – ____________________

x. काय – ____________________

## विशेषण

**नामाबद्‌दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दास 'विशेषण' असे म्हणतात.**

**उदा.** तुरट, सहावी इत्यादी.

**विशेषणांचे प्रकार**

- गुणविशेषण
- संख्याविशेषण
- सार्वनामिक विशेषण

१. **गुणविशेषण :** नामाचा गुण सांगणाऱ्या शब्दाला 'गुणविशेषण' असे म्हणतात.

**उदा.** **काळा** कुत्रा, **आंबट** कैरी, **उंच** मुलगा.

२. **संख्याविशेषण :** नामाची संख्या सांगणाऱ्या शब्दाला 'संख्याविशेषण' असे म्हणतात.

**उदा.** **दोन** कुत्रे, **खूप** कैऱ्या, **एक** मुलगा.

३. **सार्वनामिक विशेषण :** नामाच्या पूर्वी येणारे सर्वनाम त्या नामाबद्‌दल अधिक माहिती सांगत असेल, तर ते 'सार्वनामिक विशेषण' होते.

**उदा.** **माझे** घर, **त्याची** आई, **आमची** शाळा.

**लक्षात ठेवा**

माझा, माझी, तुझा, त्याचा, तिचा, तिची, तिचे, आमचा, आमची, तुमचा, असा, असला, इतका, अमका, एवढा, तसा, तसला, तितका, तेवढा, तमका, जसा, जसला, जितका, जेवढा, कोणता, केवढा, कसा, कसला या सर्वनामांपुढे नाम आल्यास ती सार्वनामिक विशेषणे होतात.

Sample Content

## सराव कृती

***१. खालील चौकोनात विशेष्य व विशेषणे एकत्रित दिली आहेत. त्यांच्या जोड्या लावा.**

काळोख, विलक्षण, पारंबी, पाऊस, वादळी, लोंबणारी, चपळाई, किट्ट.

| विशेष्य | विशेषण |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

***२. खालील शब्दांचा सहसंबंध लावा.**

शुभ्र
प्रसन्न
लालसोनेरी
निळसर
हळदुली

किरणे
प्रकाश
चांदणे
सकाळ
पट्टे

**३. खालील वाक्यांतील विशेषणे ओळखा.**

i. एके दिवशी एक तरुण गावात आला. –

ii. कपात लाल चहा शंकरच्या पुढ्यात केला. –

iii. हिरवा चारा मिळाल्यानं बैलं मस्त जोगली होती. –

iv. बियांपासून मिळणारे सुगंधी तेल यांचे महत्त्व विशद केले. –

v. अद्याप गुडूप अंधार होता. –

vi. बाबांच्या मुक्या शब्दांचा मार निमूटपणे सोसला. –

vii. एकच सुंदर स्वप्न दोघांनाही एकदम पडले होते. –

viii. तो एक छोटा दुकानदार होता. –

ix. आत तीन हजार रुपये होते. –

Sample Content

## ४. खालील वाक्यांतील विशेषण ओळखून प्रकार लिहा.

i. जवळच एका दगडावर मी बसलो.

**उत्तर :** ----------------------------------------

ii. ओलसर वारं खोऱ्याकडे वाहत होतं.

**उत्तर :** ----------------------------------------

iii. थंडगार दगडावर बसून मी चांगलाच गारठलो.

**उत्तर :** ----------------------------------------

iv. मी आठ पाय असलेले कीटक जमा केले.

**उत्तर :** ----------------------------------------

v. राजू चौकस बुद्धीचा, जिज्ञासू मुलगा.

**उत्तर :** ----------------------------------------

vi. दोन्ही धोंडे त्याने खिशात टाकले.

**उत्तर :** ----------------------------------------

vii. मी तुमच्या गावात आलो आहे.

**उत्तर :** ----------------------------------------

viii. लहानग्या गोंडस पिल्लाला आधार मिळाला.

**उत्तर :** ----------------------------------------

ix. शेखचा चेहरा दु:खी दिसत होता.

**उत्तर :** ----------------------------------------

x. भल्या पहाटे उठून सखूने भाकऱ्या थापल्या.

**उत्तर :** ----------------------------------------

Sample Content

## ५. पुढील विशेषणांचा वाक्यात उपयोग करा.

i. सर्व – ----------------------------------------

ii. बारावे – ----------------------------------------

iii. शूर – ----------------------------------------

iv. पुष्कळ – ----------------------------------------

v. हिरवीगार – ----------------------------------------

## ६. योग्य जोड्या लावा.

| क्र. | 'अ' गट | उत्तर | | 'ब' गट |
|---|---|---|---|---|
| i. | **माझे** घर | ---------------- | अ. | गुणविशेषण |
| ii. | **कडू** कारले | ---------------- | ब. | संख्याविशेषण |
| iii. | **एक** झाड | ---------------- | क. | सार्वनामिक विशेषण |

### क्रियापद

**वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दाला 'क्रियापद' असे म्हणतात.**

**क्रियापदाचे प्रकार**

सकर्मक | अकर्मक | सहाय्यक | संयुक्त

१. **सकर्मक क्रियापद :** क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची आवश्यकता असेल, तर ते 'सकर्मक क्रियापद' असते.

**उदा.** कोळी मासे पकडतो.
↓ ↓ ↓
(कर्ता) (कर्म) (क्रियापद)

राजू गोष्ट सांगतो.
↓ ↓ ↓
(कर्ता) (कर्म) (क्रियापद)

(**टीप :** क्रियापदाला 'कोण' हा प्रश्न विचारल्यानंतर जे उत्तर मिळते तो 'कर्ता' असतो.)

२. **अकर्मक क्रियापद :** ज्या क्रियापदांचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची आवश्यकता नसते त्यांना 'अकर्मक क्रियापद' म्हणतात.

**उदा.** राम खेळताना **पडला.**
ती जोरात **रडली.**
विद्या तेथे **आली.**

३. **सहाय्यक क्रियापद :** कधी कधी वाक्याचा अर्थ पूर्ण होण्यासाठी मुख्य क्रियावाचक शब्दाला दुसऱ्या एखाद्या क्रियापदाचे सहाय्य घ्यावे लागते. या क्रियापदाला 'सहाय्यक क्रियापद' म्हणतात.

**उदा.** बाळ धावू **लागले.**
ती येत **आहे.**

४. **संयुक्त क्रियापद :** मुख्य क्रियावाचक शब्द आणि त्याला सहाय्य करणारे दुसरे क्रियापद यांचे मिळून क्रियापद तयार होते त्याला 'संयुक्त क्रियापद' असे म्हणतात.

धातुसाधित + सहाय्यक क्रियापद = संयुक्त क्रियापद

**उदा.** रामभाऊ **धावत आला.**
हे पाणी **पिऊन टाक.**

Sample Content

## सराव कृती

### १. खालील वाक्यांतील क्रियापदे ओळखा.

i. आम्ही आवाजाच्या दिशेने धावत जायचो. – ------------------------------
ii. लोक त्याच्याविषयी भरभरून बोलायचे. – ------------------------------
iii. तारा झटकन उठली. – ------------------------------
iv. परात हातात घेत लक्ष्मी उभी राहिली. – ------------------------------
v. मी सांगतो त्यांना आपला इतिहास. – ------------------------------
vi. गदर उठावाच्या आखणीत ते आघाडीवर होते. – ------------------------------
vii. सदाने डोक्याला हात लावला. – ------------------------------
viii. स्वारीने गाव ओलांडले. – ------------------------------
ix. डांग्या लहानाचा मोठा होऊ लागला. – ------------------------------
x. पहाटे लवकर जाग आली. – ------------------------------

### २. खालील वाक्यांतील सकर्मक व अकर्मक क्रियापदे ओळखा.

i. आम्ही समाधानी आहोत. – ------------------------------
ii. माझ्या तोंडून शब्द फुटेना. – ------------------------------
iii. आम्ही सगळी मुलं पाराजवळ जमलो. – ------------------------------
iv. कीटकाच्या पावलांचा कंप तिला जाणवला. – ------------------------------
v. सोबगला ती अगदी सहज पकडे. – ------------------------------
vi. राजू घरी आला. – ------------------------------
vii. सगळ्यांनी अंथरुणं पसरली. – ------------------------------
viii. तारानं वसंतला कुरवाळलं. – ------------------------------

### ३. खालील कोष्टक पूर्ण करा.

i. माणसाला स्वप्नं बघता आली पाहिजेत.
ii. तो तरुण सपनविक्यासारखाच दिसत होता.
iii. मामू चिठ्ठी देऊन गेलाय.
iv. धातूंच्या पाठोपाठ काचेपासून वस्तू बनू लागल्या.
v. टिळकांच्या सहवासात राहणं ही भाऊंना मोठी पर्वणीच वाटत असे.
vi. सदाचे व्यवस्थित चालले होते.
vii. माझी पावलं नकळत त्याच्या दिशेनं खेचली गेली.
viii. त्याचा नामकरण सोहळा क्षणभरात आटोपला गेला.
ix. पहाटेचे एकच सुंदर स्वप्न दोघांनाही एकदम पडले होते.
x. त्यावेळी आम्ही सर्वजण मिठाई खात होतो.

Sample Content

| क्र. | धातुसाधित | सहायक क्रियापद | संयुक्त क्रियापद |
|---|---|---|---|
| i. | ---------------------- | ------------------------------ | ---------------------------------------- |
| ii. | ---------------------- | ------------------------------ | ---------------------------------------- |
| iii. | ---------------------- | ------------------------------ | ---------------------------------------- |
| iv. | ---------------------- | ------------------------------ | ---------------------------------------- |
| v. | ---------------------- | ------------------------------ | ---------------------------------------- |
| vi. | ---------------------- | ------------------------------ | ---------------------------------------- |
| vii. | ---------------------- | ------------------------------ | ---------------------------------------- |
| viii. | ---------------------- | ------------------------------ | ---------------------------------------- |
| ix. | ---------------------- | ------------------------------ | ---------------------------------------- |
| x. | ---------------------- | ------------------------------ | ---------------------------------------- |

## ४. पुढील क्रियापदांचा वाक्यात उपयोग करा.

i. खेळणे – ----------------------------------------------------------------------------------------------

ii. पडणे – ----------------------------------------------------------------------------------------------

iii. वाटणे – ----------------------------------------------------------------------------------------------

iv. येणे – ----------------------------------------------------------------------------------------------

v. जाणे – ----------------------------------------------------------------------------------------------

vi. नसणे – ----------------------------------------------------------------------------------------------

vii. जगणे – ----------------------------------------------------------------------------------------------

viii. सुचणे – ----------------------------------------------------------------------------------------------

ix. सापडणे – ----------------------------------------------------------------------------------------------

x. होणे – ----------------------------------------------------------------------------------------------

Sample Content

## क्रियाविशेषण अव्यय

**क्रियापदाबद्दल अधिक माहिती देणारा शब्द म्हणजे क्रियाविशेषण अव्यय होय.**

| क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार व त्यांची उदाहरणे | | | |
|---|---|---|---|
| **कालवाचक क्रियाविशेषण अव्यय** | **स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय** | **रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय** | **परिमाणवाचक / संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यय** |
| वाक्यातील क्रिया केव्हा घडली हे ज्या क्रियाविशेषण अव्ययामुळे समजते त्याला 'कालवाचक क्रियाविशेषण अव्यय' असे म्हणतात. **उदा.** आधी, सध्या, हल्ली, सदा, नित्य, वारंवार इत्यादी. | वाक्यातील क्रिया कुठे घडली हे ज्या क्रियाविशेषण अव्ययामुळे समजते त्याला 'स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय' असे म्हणतात. **उदा.** सर्वत्र, इथे, जिथे, जिकडे, खाली, मागे, पलीकडे इत्यादी. | वाक्यातील क्रिया कशी घडली हे ज्या क्रियाविशेषण अव्ययामुळे समजते त्याला 'रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय' असे म्हणतात. **उदा.** पटकन, पटपट, झटकन, जलद, आपोआप इत्यादी. | वाक्यातील क्रिया किती वेळा घडली हे ज्या क्रियाविशेषण अव्ययामुळे समजते त्याला 'परिमाणवाचक/संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यय' म्हणतात. **उदा.** किंचित, काहीसा, दोनदा, अत्यंत, मोजके इत्यादी. |

## सराव कृती

**१. खालील उताऱ्यातील क्रियाविशेषण अव्यये अधोरेखित करा.**

अभय वारंवार मैदानावर जातो. मैदान त्याच्या घराच्या पलीकडे आहे. मी अनेकदा त्याच्या घरी जातो. आजही आम्ही भेटलो होतो. मला पाहताच तो झटकन आला. मी त्याला म्हणालो, "तू हल्ली सारखा मैदानावर असतोस. मी काल तुझी गृहपाठ करण्यासाठी खूप वाट पाहिली. मला तुझ्याशिवाय अजिबात करमत नाही. मी तुला नेहमी सांगतो, की दररोज अभ्यास कर. त्यामुळे, तुझी बौद्धिक ताकद आपोआप वाढेल."

**२. खालील वाक्यांतील क्रियाविशेषण अव्यये शोधून लिहा.**

i. चामडी पिशवीतलं पाणी घटघटा प्यायचा. – ----------------------------

ii. अचानकच सपनविक्या यायचा बंद झाला. – ----------------------------

iii. तारा झटकन अंग झटकून उठली. – ----------------------------

iv. दरवेळी त्याची समजूत घालता सदा मेटाकुटीला येई. – ----------------------------

v. सदा तरातरा चालत आला. – ----------------------------

vi. तो थाड्थाड् उडू लागला. – ----------------------------

vii. जिकडे तिकडे झगमगाट पसरलेला. – ----------------------------

viii. त्याच्या नावाची किर्ती सर्वदूर पसरली. – ----------------------------

ix. तो माझ्या स्वागतासाठी दुडदुडत यायचा. – ----------------------------

x. उद्या तिचं ऑपरेशन आहे. – ----------------------------

Sample Content

## *३. खाली दिलेल्या शब्दांचे क्रियाविशेषण अव्ययांच्या प्रकारानुसार वर्गीकरण करा.

तिथे, दररोज, क्षणोक्षणी, सावकाश, तिकडे, अतिशय, पूर्ण, परवा, जरा, मुळीच, कसे, वर, थोडा, सतत, झटकन.

| कालवाचक क्रियाविशेषण अव्यये | स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये | रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये | कालवाचक क्रियाविशेषण अव्यये |
|---|---|---|---|
| ------------------------ | ------------------------ | ------------------------ | ------------------------ |
| ------------------------ | ------------------------ | ------------------------ | ------------------------ |

## *४. खालील चौकोनांतील अक्षरांमध्ये क्रियाविशेषणे लपलेली आहेत. उभ्या, आडव्या व तिरप्या पद्धतीने अक्षरे घेऊन क्रियाविशेषणे तयार करा व दिलेल्या जागेत लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ह | ळू | थो | डे | आ | रो |
| आ | ज | डा | मो | ज | के |
| ज | रा | सा | व | का | श |
| त | सा | जि | र | ल | ही |
| अ | ने | क | दा | चि | त |
| ति | क | डे | खा | ली | र |

उत्तर : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

## ५. खाली दिलेला तक्ता पूर्ण करा.

| क्र. | वाक्य | क्रियापद | क्रियाविशेषण | प्रकार |
|---|---|---|---|---|
| *i. | काल तो मुंबईला गेला. | -------------------- | -------------------- | -------------------- |
| *ii. | तो भरभर जेवतो. | -------------------- | -------------------- | -------------------- |
| *iii. | इथे शहाळी मिळतात. | -------------------- | -------------------- | -------------------- |
| *iv. | मी तो धडा दोनदा वाचला. | -------------------- | -------------------- | -------------------- |
| v. | तू केव्हा येणार ? | -------------------- | -------------------- | -------------------- |
| vi. | नेहमी खरे बोलावे. | -------------------- | -------------------- | -------------------- |
| vii. | पलीकडे गाव आहे. | -------------------- | -------------------- | -------------------- |
| viii. | तो भरपूर खेळला. | -------------------- | -------------------- | -------------------- |

Sample Content

## ६. अधोरेखित क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार ओळखा.

i. यंदा पाऊस पडणार नाही. – ------------------------------
ii. सभोवार काळोख पसरला होतो. – ------------------------------
iii. मी दररोज अभ्यास करतो. – ------------------------------
iv. सर्वत्र चांदणे पसरले होते. – ------------------------------
v. तो बिलकूल घाबरला नाही. – ------------------------------
vi. बाण वर गेला. – ------------------------------
vii. पूर्वी लोक खूप मेहनत करत. – ------------------------------
viii. तो सावकाश आला. – ------------------------------
ix. पाणी खळखळ वाहते. – ------------------------------
x. महेश आपोआप विसरला. – ------------------------------

## *७. खालील वाक्यांत कंसातील योग्य रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये लिहा.

(ढसाढसा, सावकाश, टप्टप्, आपोआप)

i. माझ्या डोळ्यांतून ------------------------------ आसवे गळू लागली.
ii. मी आईच्या गळ्यात पडून ------------------------------ रडलो.
iii. रात्र होताच सगळ्यांचे डोळे ------------------------------ मिटू लागतात.
iv. पक्ष्याने आपले पंख ------------------------------ फडफडवले.

### शब्दयोगी अव्यय

**वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांना जोडून येणाऱ्या अविकारी शब्दाला 'शब्दयोगी अव्यय' असे म्हणतात. शब्दयोगी अव्यय जोडून आल्यामुळे नामाचा किंवा सर्वनामाचा वाक्यातील इतर शब्दांशी असलेला संबंध दर्शविला जातो.**

**उदा.** मी घरापर्यंत धावत गेलो. झाडावर पक्षी बसला होता. जेवणापूर्वी औषध घ्या.

**लक्षात ठेवा**

शब्दयोगी अव्यय नाम/सर्वनामाला जोडून येत असले तरीही 'फक्त', 'केवळ', 'मात्र', 'फक्त' ही शब्दयोगी अव्यये स्वतंत्र लिहिली जातात.

अनेक क्रियाविशेषण अव्यये शब्दयोगी अव्यये म्हणून वापरली जातात. क्रियाविशेषण अव्यये व शब्दयोगी अव्ययातील मुख्य फरक म्हणजे क्रियाविशेषण अव्यये स्वतंत्र लिहिली जातात, तर शब्दयोगी अव्यये नामाला अथवा सर्वनामाला जोडून येतात.

| शब्दयोगी अव्यय | क्रियाविशेषण अव्यय |
|---|---|
| जेवणापूर्वी हात धुवावेत. | तो पूर्वी सैन्यात होता. |
| मी रोज सकाळी सहानंतर उठतो. | नंतर राजेशाही बंद पडली. |
| तो आरशासमोर उभा होता. | माझा मित्र समोर उभा होता. |
| डोंगरावर हिरवेगार गवत उगवले होते. | ताईने वर पाहिले. |

Sample Content

शब्दयोगी अव्यय सामान्यतः नाम किंवा सर्वनामांना जोडून येत असले तरी कधीकधी ते क्रियापद व क्रियाविशेषण यांनाही जोडून येते.
**उदा.** खाल्यावर, बोलल्यानंतर, कालपेक्षा, आजपर्यंत.

**शब्दयोगी अव्यय-**
नाम किंवा सर्वनामाला शब्दयोगी अव्यय जोडताना मूळ शब्दात बदल होतो याला 'सामान्यरूप' असे म्हणतात.
**उदा.** शाळा + पुढे = शाळेपुढे
झाड + वर = झाडावर
'शाळे' 'झाडा' हे सामान्यरूप झालेले शब्द आहेत.

## सराव कृती

***१. खालील परिच्छेद वाचा. त्यातील शब्दयोगी अव्यये अधोरेखित करा.**

आमच्या शाळेसमोर वडाचे झाड आहे. झाडाभोवती भक्कम पार बांधला आहे. त्या पारावर बसून आम्ही डबा खातो. झाडाखाली खेळतो. शाळेची घंटा होईपर्यंत झाडावर मुलांची गर्दी असते. हे वडाचे झाड शाळेच्या पहिल्या दिवसापासून मला एखाद्या मित्राप्रमाणे वाटते.

***२. खालील शब्दांचा 'क्रियाविशेषण' व 'शब्दयोगी अव्यये' असा दोन्ही प्रकारे उपयोग करून प्रत्येकी दोन वाक्ये लिहा.**

पुढे, मागे, बाहेर, खाली, जवळ, नंतर

| क्र. | क्रियाविशेषण अव्यय | शब्दयोगी अव्यय |
|---|---|---|
| i. | ------------------------ | ------------------------ |
| ii. | ------------------------ | ------------------------ |
| iii. | ------------------------ | ------------------------ |
| iv. | ------------------------ | ------------------------ |
| v. | ------------------------ | ------------------------ |
| vi. | ------------------------ | ------------------------ |

***३. खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा व ती कोणत्या शब्दांशी संबंध जोडतात ते लिहा.**

i. मी परीक्षेनंतर पोहण्यास शिकणार आहे. – ------------------------
ii. तुझ्यादेखील हे लक्षात कसे आले नाही? – ------------------------
iii. रस्त्यावरील विजेचे दिवे गेले होते. – ------------------------
iv. देशाला देण्यासाठी तुमच्याकडे दहा मिनिटे वेळ आहे का? – ------------------------

Sample Content

## ४. खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा.

i. असं आपणच नाही, तर आपल्यापेक्षा श्रेष्ठ असे सगळेच लोक म्हणत असतात. – ------------------------------

ii. इतरांपासून आपल्याला वेगळं करतात. – ------------------------------

iii. एका गावाकडून एक स्वप्नं विकणारा माणूस घोड्यावर बसून आमच्या गावाकडे यायचा. – ------------------------------

iv. त्यानं आजवर घोड्यावरून खूप प्रवास केलेला होता. – ------------------------------

v. मीरा अन् वसंतानं झिऱ्यावर पाण्यासाठी नंबर लावला होता. – ------------------------------

vi. वसंत कोपीबाहेर बसलेल्या शंकराच्या मागे जाऊन उभा ठाकला. – ------------------------------

vii. खाटेवरून धाडकन उडी घेऊन पळतच बापाजवळ येत त्याने गिल्ला केला. – ------------------------------

viii. माझ्या अंगावरील ब्लँकेटच्या उबेमुळे त्याला थंडीपासून संरक्षण मिळालं. – ------------------------------

ix. त्या अनाथ मुलीकडे पाहून मला वाईट वाटलं. – ------------------------------

x. हॉलीवूडपासून दूर अशा डोंगराकडे मी गाडी वळवली. – ------------------------------

### उभयान्वयी अव्यय

**दोन किंवा अधिक शब्दांना अथवा वाक्यांना जोडणाऱ्या अविकारी शब्दांना 'उभयान्वयी अव्यये' म्हणतात.**

**उदा.** आणि, व, पण, परंतु, किंवा, अथवा, म्हणून, शिवाय, अन्, आणखी, आणिक, न्, नि, वा, अगर, परी, बाकी, सबब, याकरिता, म्हणजे, की, कारण, यास्तव इत्यादी.

१. राम आणि राजू चांगले मित्र आहेत.    २. तो शाळेत गेला; परंतु तेथे कोणीही नव्हते.

## सराव कृती

## १. खालील परिच्छेद वाचा व यातील उभयान्वयी अव्ययांना अधोरेखित करा.

i. नंदा आणि आई मंडईत पोहोचल्या अन् पावसाची रिमझिम सुरू झाली. आई नंदाला म्हणाली, "तू कांदे, बटाटे व लसूण घे, तोपर्यंत मी भाजीपाला घेते." आईने भाजीपाला खरेदी केला, शिवाय फळेही घेतली. नंदाने आईला विचारले, "आई, लसूण घेऊ की आले घेऊ?" आई म्हणाली, "दोन्ही घे; पण लवकर आवर, कारण जोराचा पाऊस सुरू होईल. पाऊस आला, तर आपण भिजू; म्हणून तुला 'घाई कर' असं सांगते आहे." नंदा म्हणाली, "कशाला एवढी चिंता करतेस? आपण रिक्षा किंवा बसने घरी जाऊ, म्हणजे आपण पावसात भिजणार नाही."

ii. रोहन आणि सुनिल मैदानात उतरले. दोघांनी फलंदाजीला सुरुवात केली अन् धावांचा वेग वाढला. गोलंदाजांनी वेगवेगळ्या युक्त्या वापरल्या; परंतु त्यांना यश मिळाले नाही. शेवटी अजयने ही जोडी फोडली, तोपर्यंत उशीर झाला होता. या दोघांनी धावा बनवल्या, शिवाय आपल्या संघाला विजयाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले. सुनिलने नव्या फलंदाजाला विचारले, "तू फटकेबाजी करशील की मी करू?" तो म्हणाला, "तू कर; पण बाद होऊ नकोस; कारण तू बाद झालास, तर सामन्याचे पारडे अजूनही फिरू शकते; म्हणून तू सावध फटकेबाजी कर." सुनिल म्हणाला, "काळजी करू नकोस. मी फटकेबाजी करेन पण सावध खेळेन, म्हणजे तुझ्यावर दबाव येणार नाही."

Sample Content

## *२. खालील उभयान्वयी अव्ययांचा वाक्यात उपयोग करा.

i. की – ----------------

ii. म्हणून – ----------------

iii. पण – ----------------

iv. परंतु – ----------------

v. अथवा – ----------------

vi. म्हणजे – ----------------

## ३. खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.

*i. सशाची आणि कासवाची पळण्याची शर्यत लागली.
*ii. आईने काटकसर केली; पण शिल्लक काही उरले नाही.
*iii. ती कलिंगड किंवा खरबूज आणणार आहे.
iv. आता स्वप्नं निर्माण करावी लागतात, की ती उत्पन्न होतात हे आपल्याला माहीत नाही.
v. बालपणी आम्हांला स्वप्नांचा खरा अर्थही कळत नव्हता; पण स्वप्न या शब्दाशी आमचा परिचय झालेला होता.
vi. मीरा अन् वसंतानं झिऱ्यावर पाण्यासाठी नंबर लावला होता.
vii. अरुण व अदिती आजीआजोबांकडे गावी पोहोचले.
viii. पहाटेपर्यंत कुठेतरी आश्रय घेऊ नि झुंजूमुंजू होताच इथून निघून जाऊ.
ix. त्यानं उठण्याचा प्रयत्न केला; पण पाय बधिर झालेले.
x. त्याला कायमचा आधार मिळावा म्हणून मी त्याला थेट माझ्या घरी घेऊन आलो.

### केवलप्रयोगी अव्यय

आपल्या मनात दाटून आलेल्या भावना ज्या शब्दांच्याद्वारे अचानकपणे बाहेर पडतात त्यांना ‘केवलप्रयोगी अव्यये’ असे म्हणतात. या शब्दांनाच ते उद्गार असल्यामुळे ‘उद्गारवाचक शब्द’ असेही म्हटले जाते.
केवलप्रयोगी अव्ययांना अर्थ नसतो किंवा ती वाक्याचा भाग नसतात; मात्र त्यांच्या वापरामुळे भाषेचे सौंदर्य खुलते. ते केवळ भावनेचे उद्गार असतात.

**उदा. बापरे!** किती मोठा आहे हा प्राणी! **अरेरे!** खूप वाईट झाले!

| क्र. | केवलप्रयोगी अव्यय | शब्द |
|---|---|---|
| १. | हर्षदर्शक | अहाहा, आ-हा, अहा, वा, ओहो |
| २. | शोकदर्शक | आई गं, हाय, हायहाय, अरेरे, देवारे |
| ३. | आश्चर्यदर्शक | ओहो, अबब, अहाहा, अरेच्चा, ओ, बापरे |
| ४. | प्रशंसादर्शक | वाहवा, शाब्बास, छान, ठीक, भले, फक्कड |
| ५. | संमतिदर्शक | ठीक, जी, हां, जीहां, बराय, अच्छा |
| ६. | विरोधदर्शक | छेछे, अंहं, उंहू, हॅट, छट्, छे |
| ७. | तिरस्कारदर्शक | शी, हुड, हत्, छत्, थु:, इश्श, छी |
| ८. | संबोधनदर्शक | अरे, अहो, ए, अगा, अगं, रे, बा |
| ९. | मौनदर्शक | चूप, गप, गुपचूप, चुपचाप |

Sample Content



शाब्बास!
चांगले काम केलेस बाळा!



अरेरे!
फार वाईट झाले!



बापरे!
केवढा मोठा साप!



अहाहा!
पिसारा फुलवलेला मोर!

## सराव कृती

### १. खालील वाक्यांतील योग्य केवलप्रयोगी अव्यये लिहा.

i. अहाहा! काय सुंदर बाग आहे ही! – ------------------------------

ii. छे! तो असे म्हणालाच नाही! – ------------------------------

iii. बापरे! केवढा मोठा हा साप! – ------------------------------

iv. अरे! कुठे चाललास तिकडे? – ------------------------------

v. शाबास! असेच यश मिळवत राहा. – ------------------------------

vi. छट्! मला हे अजिबात मान्य नाही. – ------------------------------

### २. खालील केवलप्रयोगी अव्ययांचे वाक्यात उपयोग करा.

i. वाहवा – ------------------------------

ii. छी – ------------------------------

iii. हाय-हाय – ------------------------------

iv. चूप – ------------------------------

v. अरेच्या – ------------------------------

vi. अहो – ------------------------------

vii. इश्श – ------------------------------

### *३. खालील केवलप्रयोगी अव्ययांचे वाक्यात उपयोग करा.

i. -------------------- काय सुंदर आहे ताजमहाल!

ii. -------------------- किती जोरात ठेच लागली!

iii. -------------------- किती उंच आहे ही इमारत!

Sample Content

## ४. योग्य जोड्या जुळवा.

| क्र. | 'अ' गट | उत्तर | | 'ब' गट |
|---|---|---|---|---|
| i. | ओहो | ------------------------------ | अ. | संबोधनदर्शक |
| ii. | अरेच्या | ------------------------------ | ब. | मौन दर्शक |
| iii. | देवा रे | ------------------------------ | क. | तिरस्कारदर्शक |
| iv. | छान | ------------------------------ | ड. | विरोधदर्शक |
| v. | अच्छा | ------------------------------ | इ. | संमतीदर्शक |
| vi. | छट् | ------------------------------ | फ. | प्रशंसादर्शक |
| vii. | शी | ------------------------------ | ग. | आश्चर्यदर्शक |
| viii. | ए | ------------------------------ | ह. | शोकदर्शक |
| ix. | चूप | ------------------------------ | ज. | हर्षदर्शक |

## *५. खालील चित्र पाहून आपल्या भावना व्यक्त करणारी वाक्ये लिहा.

i.



ii.



उत्तर : ------------------------------------------------ ------------------------------------------------

------------------------------------------------ ------------------------------------------------

Sample Content

# AVAILABLE BOOKS FOR STD. VII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### NOTES
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### ADDITIONAL TITLES
GRAMMAR & WRITING SKILLS BOOKS (STD. VII & VIII)
- English
- Marathi
- Hindi

# AVAILABLE BOOKS FOR STD. VIII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History and Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### NOTES
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- My English Book
- मराठी बालभारती

### OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery



Explore our range of STATIONERY

Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

**Address:**
B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z,
Wagle Industrial Estate, Thane (W)- 400604

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org

Visit Our Website